महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**अर्जाचा नमुना**

**"विधि अधिकारी गट–ब"** पदाकरिता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :– ..............................................................

**(कोणत्याही एक परिक्षेत्रिय कार्यालय किंवा मुंबई घटक किंवा मुख्यालय, याचा स्पष्ट उल्लेख करावा.)**

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडावा

कार्यालयीन उपयोगासाठी.

१) अर्ज क्रमांक :

२) अर्ज स्विकारल्याचा दिनांक :

३) अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह): ..............................................................

सुचना : १) अर्जदाराने अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

२) अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणी माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

३) आवश्यक नसेल तेथे खोडवे.

अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती.

१) अर्जदारांचे संपूर्ण नांव : आडनांव नाव वडिलांचे नांव/पतीचे नाव

मराठीत : ..............................................................

इंग्रजीत :

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ..............................................................

..............................................................

E-Mail Address : ..............................................................

३) कायमचा पत्ता : ..............................................................

..............................................................

तालुका : .......................... जिल्हा : .......................... पिन कोड : ..........................

४) दूरध्वनी क्रमांक : लॅन्डलाईन : .......................... भ्रमणध्वनी क्रमांक : ..........................

५) जन्मदिनांक : दिवस महिना वर्ष जन्मस्थळ : ..........................

६) **दिनांक २५/०१/२०२४** रोजीचे वय वर्ष महिना दिवस

७) लिंग : पुरूष / महिला

८) धर्म : ..............................................................

९) क्रिमीलेअर आहे काय : होय/नाही.

१०) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय? होय नाही

योग्य असेल त्या ठिकाणी ✓ अशी खुण करावी.

## (ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेच नाव (विधालय/महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) | | | | | |
| २) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) | | | | | |
| ३) पदवी | | | | | |
| ४) विधि पदवी | | | | | |
| ५) विधि पदयुत्तर पदवी | | | | | |

१२) इतर शैक्षणिक अर्हता : ....................................................................................

इतर शैक्षणिक अर्हता : ....................................................................................

संगणक प्रशिक्षित आहात काय ? होय ☐ नाही ☐

१३) अर्जदाराची इतर माहिती :

अ. सनद घेतल्याचा दिनांक

ब. उमेदवाराचे स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल : ..........................................................

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |
| | | | |

टिप : वकिली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१४) अर्जदार यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/

अ) दंड करण्यात/सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय ? किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? **होय / नाही**

किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडुन किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडुन/संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? काढुन टाकण्यात आले आहे काय ? **होय / नाही**

१४) हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक

ब) प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? **होय / नाही**

(१४ – अ किंवा १४ – ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षा आदेश इत्यादीचा संपूर्ण तपशील आणि न्यायालयीन/विद्यापीठ,शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे.)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री/सौ/कु.........................................................................................................

याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहिरातील दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास, त्याबाबत माझी काहीही तक्रार राहाणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

दिनांक :

सोबत : अर्जात नमुद केलेल्या बाबीच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०३०**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील घटक कार्यालयाच्या आस्थपनेवरील गट ब अधिकारी यांच्या खालील जागा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील घटक कार्यलयाच्या आस्थापना खाली दर्शविलेल्या ठिकाणी विधा अधिकारी गट ब यांच्या जागा ११ महिन्यांच्या कत्राट पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र. | घटकांचे नाव | पदाचे नाव | भरावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| ७ | लाप्रवि, अमरावती (परि) | विधी अधिकारी | १ |
| एकुण | | | १ |

**सुचना -**

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाप्यात घालुन उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट ब जागेसाठी असे नमुद करुन दि.०५/०४/२०२५ पर्यत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई वरळी पोलीस कॅम्प, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-४०००३० (लक्षवेध:- अपर पोलीस महासंचालक, लाप्रवि, म राज्य, मुंबई ) या पत्यावर पोहचल याची दक्षता घेवुन विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा दि.०५/०४/२०२५ नंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही अर्जासोबत पत्र व्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

टिप- वर दर्शविलेल्या पदसंख्येत / नियुक्तीच्या ठिकाणात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामध्ये बद करण्याचे त्याच प्रमाणे त रद्य करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील.

**<u>करारातील मासिक देय रक्कम bnn.</u>**

शासन निर्णय, क्र. डीपीपी -२०१४ / प्र.क्र.०७/ पोल-१० दि.२१/०८/२०१८ मध्ये विहित केल्याप्रमाणे विधी अधिकारी या पदाकरिता मासिक देय रक्कम रु.२५,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रु. ३,०००/- असे एकूण २८,०००/- दरमहा देय राहतील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

(अरुण पाटील)
अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय)
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**शैक्षणिक अर्हता / वयोमर्यादा / अनुभव :-**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल, तो सनदधारक असेल.

२. विधी अधिकारी गट-ब पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक असेल.

३. उमेदवारास संबंधित पदाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण ज्ञान असेल आणि तो संबंधित कायद्याचे प्रशिक्षण देण्यास सक्षम असेल.

४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

५. शासन निर्णय, गृहविभाग, एसपीपी २००९/९२२/प्र.क्र.१०९/पोल-१०, दि. १८.०६.२००९ नुसार विधी अधिकारी पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचे वेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.

**किंवा**

६. जी व्यक्ती शासकिय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकिय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अननुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकिय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**विधी अधिकाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या :**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. ....सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशा तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशाप्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

अ.पो.अ. 27/3/25

**(अरुण पाटील)**
अपर पोलीस अधीक्षक (मुख्यालय)
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

अटी व शर्ती :

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय अधिकारी / कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथम ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना एका वेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास उमेदवाराची पुनश्च: निवड प्रकियेला सामोरे जावे लागेल.

३. उमेदवाराची निवड करतांना प्रथम ५० गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. लेखी व तोंडी परीक्षेत प्राप्त गुण एकत्रित करून एकूण गुणानुक्रमानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नेमणुकीसंबंधी कार्यवाही करण्यात येईल. तसेच, नियुक्ती देण्यासाठी कमीत कमी ६० टक्के गुण आवश्यक राहील.

४. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याची लेखी परवानगीशिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

५. लेखी परीक्षेचा दिनांक व लेखी परीक्षेचे केंद्र ई-मेलद्वारे अवगत करण्यात येईल.

६. लेखी परीक्षा झाल्यानंतर उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक व मुलाखत ज्या ठिकाणी होईल, त्याबाबतचे ठिकाण उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

७. उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

८. नियुक्त केलेल्या उमेदवारास दि. १५.०९.२००६ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ब नुसार करारनामा (Agreement) करणे अनिवार्य राहील.

९. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

१०. उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी अर्ज भरण्याच्या दिनांकास पूर्ण करणे आवश्यक आहे.

११. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे (Passport Size Photo) सध्याचे काढलेले व स्वाक्षरी केलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

१२. नियुक्ती केलेल्या उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम तरतुदीनुसार कोणतेही प्रकारची रजा देय असणार नाही.

१३. नियुक्ती प्रधिकाऱ्यांनी निवड केलेल्या उमेदवारांना विधी अधिकारी पदावर नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या आत नियुक्ती स्विकारणे क्रमप्राप्त आहे. उमेदवाराने त्यांची नियुक्ती विधी अधिकारी पदावरील नियुक्ती स्वाकारली नाही तर त्याची नियुक्ती रद्य करण्यात येवुन प्रतिक्षा यादीवरील अन्य उमेदवारांची निवड करण्यात येईल याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

27/3/25

(अरुण पाटील)

अपर पोलीस अधीक्षक (मुख्याल...)

लाचलुचपत प्रति...